# नागपूर जिल्ह्यातील १६ रेती घाटांची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त दि.२६/०९/२०२५.

केंद्र शासनाच्या पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या अधिसूचना दि.१४.०९.२००६ व सुधारीत अधिसूचना दि. ०१.१२.२००९ नुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी नागपूर जिल्ह्यातील एकुण १६ रेतीघाट **सावनेर तालुक्यातील** कवडस (१.५७ हेक्टर), बावनगांव-ब (२.७० हेक्टर), कोच्छी (३.६० हेक्टर), रोहना (२.१० हेक्टर), करजघाट (२.५३ हेक्टर), रामडोंगरी-अ (२.१५ हेक्टर), वाकोडी (३.५० हेक्टर), इसापूर-अ (३.६० हेक्टर) **तालुका कामठी** येथील भामेवाडा (१.८० हेक्टर), चिकना-ब (२.० हेक्टर), उनगांव (१.८० हेक्टर), **तालुका मौदा** येथील वढना (२.४० हेक्टर), किरणापूर (४.९० हेक्टर), **तालुका कुही** येथील चिचघाट (३.०० हेक्टर), **तालुका पारशिवनी** येथील गरांडा (१.५५ हेक्टर), घाटरोहना (३.० हेक्टर) रेतीघाटाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरण विषयक जनसुनावणी करीता दि. २६/०८/२०२५ रोजी अर्ज प्राप्त झाला होता.

सदर प्रस्तावानुसार नागपूर जिल्ह्यातील १६ प्रस्तावित रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी दिनांक २६/०९/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे श्री. अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीच्या सदस्या होत्या व श्रीमती. धनश्री पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडत आहोत **(सहपत्र-१).**

## पार्श्वभूमी

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांनी नागपूर जिल्ह्यातील एकुण १६ रेतीघाटांची पर्यावरण अनुमतीसाठी पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी घेण्यासाठी पत्र दि.२६/०८/२०२५ अन्वये अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्र. MPCB/JD(WPC)/ENV-PH/B-250826-FTS-0261 dtd. 26/08/2025 अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते **(सहपत्र-२).**

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-१ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर व अध्यक्ष, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडाव्या, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल, असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ यांनी भारत सरकारच्या पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालयाच्या अधिसूचना क्र. **SO 60 (E) dtd. 27th Jan. 1994** व सुधारणा दिनांक १४ सप्टेंबर, २००६ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक २७/०८/२०२५ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक सकाळ (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे(**सहपत्र-३**).

..२/-

भारत सरकारच्या पर्यावरण वने व वातावरणी बदल मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा व इतर माहिती असलेले कागदपत्रे कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत म.प्र.नि.मंडळाकडे १ सुचना ईमेल व्दारे प्राप्त झालेली आहे. **(सहपत्र-४)**.मंडळाचा आदेश क्र. ई-६८/२०२५ पत्र क्र. BO/JD (WPC)/PH -250910-FTS-0225 dtd.10/09/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे.**(सहपत्र-५)**.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-१ तथा समन्वयक यांनी प्रकल्प धारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत नागपूर जिल्ह्यातील १६ रेतीघाटाचे सादरीकरण केले व खालीलप्रमाणे प्रकल्पाबाबत माहिती दिली.

प्रकल्पाचे स्थळ, क्षेत्र तसेच वाळुचे उपलब्धतता व प्रकल्पामुळे नदीच्या प्रवाहाचे नियमन व पूर नियंत्रणासाठी होणारे फायदे तसेच प्रस्तावित उत्खनन पध्दत:-

१. मातीचे ढिगारा किंवा मातीचे उत्खनन करता येणार नाही.
२. रेती उत्खनन टोपले, पावडे द्वारे मजुरांकडुन करण्याचे प्रस्तावित.
३. उचललेली रेती ट्रॅक्टरद्वारे वाहतुक करण्याचे प्रस्तावित.
४. ट्रॅक्टर वगळता कोणतही अवजड व यांत्रिक मशिनरी उपयोगात आणता येणार नाही.
५. उत्खननाकरीता ठरवून दिलेला कालावधी हा दि. १० जून ते ३० सप्टेंबर पर्यंतचा मानसुन कालावधी वगळता जास्तीत जास्त १ वर्षाकरीता प्रस्तावित आहे.
६. रेती उचलणे किंवा रेती वाहतुकी दरम्यान एकही झाड तोडण्याची परवानगी नाही.
७. एकही रेती घाट हा माननीय राष्ट्रीय हरित लवादाच्या निर्णयानुसार नदी प्रतीबंधित क्षेत्रात प्रस्तावित नाही, असे नमुद आहे.
८. रेतीची क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक होऊ नये म्हणून ट्रॅक्टर ट्रॉली वर आकारमानाचे रंगीत पट्टे रंगविण्यात येतील, असे नमुद आहे.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर-**१** यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्या**स** त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, असे आव्हान केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री. एस.ए. सिध्दीकी, पावडी, जि.नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रेती वाहनाच्या वाहतुकीमुळे गावांतील रस्ते खराब झालेले आहेत. रस्ते बनवण्याची योजना करावी. | रेती वाहनांची वाहतुक ही गावांतील बाहेरील वळण मार्गाने होणार, अशी पर्यावरण व्यवस्थापन आराखड्यामध्ये तरतुद केलेली आहे. तसेच ग्रामपंचायतीकडून रेती घाटाच्या कंत्राटदारामार्फत रस्त्याची दुरूस्ती व देखभाल करण्यात येईल. |

**२) श्री. सुमित मिश्रा, नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रेती घाटामध्ये वृक्षांचे संगोपन व सुविधा शासन करणार काय, त्याचे प्रावधान करावे. | रेती घाटामधील वृक्षांचे संगोपन व सुविधा ही मानसून दरम्यान कंत्राटदार करेल. |

**३) श्री. विवेक पुरोहीत, नागपूर.**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | ज्या ठिकाणी वाळूचे उत्खनन होणार आहे, त्या गावांतील लोकांसाठी काही उपाययोजना केल्या आहेत का? याबाबत काही तरतुद ठेवण्यात आलेली आहे का? | कॉर्पोरेट पर्यावरणीय जबाबदारी (CER) अंतर्गत प्रत्येक रेती घाटासाठी कंत्राटदार यांनी रू. १ लक्ष पर्यंत गावअंतर्गत येणाऱ्या सरकारी शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था किंवा शौचालयाचे बांधकाम करण्यात येईल. दोन्ही व्यवस्था असल्यास मा.जिल्हाधिकारी शाळेचे निकड लक्षात घेत तशी व्यवस्था रू. १ लक्ष प्रती घाट एवढ्यापर्यंतचे निर्देश कंत्राटदार यांना देतील. |

**श्रीमती.हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी तथा सदस्या लोकसुनावणी समिती.**

यांनी प्रकल्प प्रवर्तकाला सांगितले की, पर्यावरणीय व्यवस्थापनेसाठी गुलमोहर या वृक्षांची मोठ्या प्रमाणात लागवड करावी, जेणेकरून प्रदूषण नियंत्रणात राहील, जमीनीचे भूजल पातळीवर परिणाम होणार नाही.

**श्री.अनुप खांडे, अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष लोकसुनावणी समिती.**

पर्यावरणारवर १६ रेतीघाटांमुळे त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी, सामाजिक व आर्थिक बाबीचा विचार व्हावा. मा.अध्यक्षांनी यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद करण्यात आली आहे, असे सांगितले व लोकसुनावणी संपल्याबाबत जाहिर केले.

(हेमा देशपांडे)
सदस्या, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर

(धनश्री पाटील)
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, नागपूर-१

(अनुप खांडे)
अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, नागपूर